N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** करडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0053 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/05/2023 22:56

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 22/05/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 22/05/2023
**Time From (वेळेपासून):** 15:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:40 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 22/05/2023 **Time (वेळ):** 22:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 038

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/05/2023 22:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 06 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नवेगाव बुज,मोहाडी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

<u>फिर्याद</u>

पोलीस स्टेशन, करडी.
दिनांक:-२२/०५/२०२३

नाव :- सुधीर उत्तम रोडगे, वय ४४ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. नवेगाव (बुज), ता. मोहाडी, जि. भंडारा. मोबाईल क्रमांक ७६६६४४६५२८

मी दिनांक १५/०५/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा येथे जावून पोलीस निरीक्षक अमित डहारे, सर यांचेकडे माझे आईचे नावाने असलेले घरकुल माझे नावाने ट्रान्सफर करण्यासाठी ग्रामपंचायतचा ठराव पाहीजे असल्याने ठरावाची प्रत देण्याकरीता मौजा नवेगाव (बुज) ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक गैरअर्जदार श्री. लांजेवार, ग्रामसेवक व गैरअर्जदार श्री. लालचंद चकोले शिपाई यांनी मला ७,०००/- रुपयाची मागणी केली असल्याबाबतची लेखी तक्रार दिली होती ती खालील प्रमाणे.

<u>तक्रार,</u> भंडारा दिनांक : १५/०५/२०२३ प्रति, मा. पोलीस उप- अधीक्षक साहेब,ॲन्टी करप्शन ब्युरो विभाग, भंडारा. विषय लाच मागणाऱ्या मौजा नवेगाव (बुज) ग्रामपंचायत येथील श्री.लांजेवार, ग्रामसेवक व लालचंद चकोले, चपराशी यांचेविरुध्द कार्यवाही होणेबाबत. अर्जदार सुधीर उत्तम रोडगे, वय ४४ वर्षे, व्यवसाय-मजुरी, रा. नवेगाव (बुज), ता. मोहाडी, जि. भंडारा. मोबाईल क्रमांक ७६६६४४६५२८

**महोदय,**तक्रार अर्ज देतो की, सन २०१८ मध्ये माझे वडील नामे उत्तम सखाराम रोडगे यांचे नावे घरकुल मंजुर झाले होते. त्यानंतर माझे वडील श्री. उत्तम रोडगे हे मरण पावल्याने माझे वडीलांचे नावे असलेले घरकुल माझी आई श्रीमती वच्छलाबाई उत्तम रोडगे यांचे नावाने ग्रामपंचायत नवेगाव (बुज) यांचे ठरावावरून ट्रान्सफर झाले. त्यानंतर माझी आई श्रीमती वच्छलाबाई रोडगे हिचे नावाने सदर घरकुलची पहिली किस्त २०,०००/- रूपये तीचे बॅंक खात्यात जमा झाली. त्यानंतर एप्रील २०२१ मध्ये माझी आई मरण पावली. माझी आई मरण पावल्याने आईचे नावाने असलेले घरकुल हे माझे नावाने ट्रान्सफर करण्याकरीता ग्रामपंचायतीचा ठराव पाहिजे असल्याने ठरावाकरीता लागणारे सर्व कागदपत्रे तयार करून मौजा नवेगाव (बुज) ग्रामपंचायतीचे श्री. लांजेवार, ग्रामसेवक यांचेकडे जमा केले. ग्रामपंचायतीने घेतलेल्या ठरावाची प्रत घेण्याकरीता मी ग्रामपंचायत नवेगाव (बुज) येथे दिनांक ११/०५/२०२३ रोजी गेलो असता श्री. लांजेवार, ग्रामसेवक व लालचंद चकोले, चपराशी यांनी सदर ठरावाची प्रत देण्याकरीता मला ७,०००/- रूपयाची मागणी करून दिनांक १५/०५/२०२३ रोजी ७,०००/- रुपये घेवून या असे मला बोलले आहेत.

मला गैरअर्जदार श्री. लांजेवार, ग्रामसेवक व लालचंद चकोले, चपराशी ग्रामपंचायात नवेगाव (बुज) यांनी माझे नावाने घरकुल ट्रान्सफर करण्यासाठी ग्रामपंचायतीने घेतलेल्या ठरावाची प्रत देण्याकरीता ७,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली आहे. त्यांचे सोबत माझी कोणतीही दुश्मनी किंवा आर्थिक व्यवहार नाहीत. गैरअर्जदार श्री. लांजेवार, ग्रामसेवक व लालचंद चकोले, चपराशी ग्रामपंचायत नवेगाव (बुज), ता. मोहाडी, जि. भंडारा यांना मला लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नाही. मी माझे कामात व्यस्त असल्याने गैरअर्जदार श्री. लांजेवार, ग्रामसेवक व लालचंद चकोले, चपराशी ग्रामपंचायत नवेगाव (बुज) यांचे विरुध्द तक्रार देण्याकरीता आज रोजी आलो असून त्यांचेवर कार्यवाही होणेस विनंती आहे.

मी दिलेल्या लेखी तक्रारीवर श्री. अमित डहारे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा यांनी दोन शासकिय पंच बोलाविले पंचाची व माझी ओळख करून दिली. मी दिलेली तक्रार पंचांना वावण्यास देवुन तक्रारीवर दोन्ही पंचांचे सह्या घेतल्या. श्री.डहारे, सरांनी मला गैरअर्जदार कुठे भेटतील याबाबत

22/05/23

सुधीर रोडगे
ता. २२/५/२०२३

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुधिर उत्तम रोडगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1979

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नवेगाव बुज,मोहाडी,करडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | नवेगाव बुज,मोहाडी,करडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.धनजय रामचंद्र लांजेवार | | | 1. लक्ष हास्पीटलचे मागे शंकरनगर, तकिया वार्ड भंडारा,भंडारा, भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | लालचंद गोपिचंद चकोले | | | 1. नवेगाव बुज,मोहाडी,करडी, भंडारा,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 7,000/रुपये ज्यात 500/रुपये | 7,000.00 |



Scanned with CamScanner

विचारपुस केले असता मी त्यांना सांगितले की, गैरअर्जदार यांनी त्यांना मागणी केलेले पैसे घेवून ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव (बुज) येथे बोलाविले आहे. त्यामुळे ते मला ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव (बुज) येथे भेटतील असे सांगून मी गैरअर्जदार यांचेकडे गेल्यास ते मला त्यांच वेळी मागणी केलेली लाच रक्कम मागतील असे सांगितल्याने श्री. डहारे सर यांनी मला गैरअर्जदार यांनी वेळीच लाच रक्कम मागणी केल्यास,त्यांना ती देता यावी म्हणुन मला गैरअर्जदार यांनी मागणी केलेली लाच रक्कम ७,०००/-रुपये त्यांचेकडे जमा करण्यास सांगितले. त्यामुळे मी माझे जवळ खिशात घरखर्चा करीता जमा असलेल्या पैशातील ७,०००/-रुपये ज्यात ५००/-रुपये दराचे १४ नोटा श्री. डहारे सर यांचे कडे दिल्या. त्या नोटांवर दोन्ही पंचासमक्ष प्रात्याक्षीक करुन दाखवीले. त्यांनतर त्यांचे कार्यालयात असलेले सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर, तसेच सॅनडिस्क कंपनीचे मेमोरी कार्ड दाखवून त्यांचा सुध्दा कार्यवाही वेळी कसा उपयोग केला जातो याबाबत कार्यवाही संबंधाने मला तसेच दोन्ही पंचांना सविस्तर माहिती दिली.

त्यानंतर गैरअर्जदार यांनी मला पैसे घेवुन ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव (बुज) येथे बोलाविले असल्याने श्री. डहारे सर यांना आपण पुढील कार्यवाही निलज (खुर्द) पटाची दान परिसरातुन करण्याची विनंती केली. मी माझे मोटार सायकलने निलज (खुर्द) पटाचे दानीवर माझे मागोमाग श्री.डहारे सर आणि त्यांचा स्टाफ आले. गैरअर्जदार यांनी मला पैशाची मागणी केली किंवा कसे? याबाबत पडताळणी करणे करीता श्री.डहारे सर यांनी त्यांचे बॅग मधुन व्हॉईस रेकॉर्डर, सेल आणि नविन मेमोरी कार्ड बाहेर काढुन त्यात नवीन मेमोरी कार्ड टाकुन पंच श्री. गडमडे यांचे आवाजात व्हॉईस रेकॉडर सुरु केला. मी माझे मोटार सायकलने पंच श्री. गडमडे यांचे सोबत गैरअर्जदार यांना भेटण्याकरीता नवेगाव (बुज) ग्रामपचंयात येथे गेलो. तिथे मला गैरअर्जदार लालचंद चकोले हे भेटले. मी त्यांना साहेब आले का असे विचारले असता त्यांनी साहेबांनी सहया मारल्या आणि गोंदिया येथे गेले असल्याचे सांगितले. त्यावर मी गैरअर्जदार यास साहेबाला थोडे कमी करावा लावशील असे बोललो असता तुला त्याच दिवशी सांगितलो होतो, असे बोलले म्हणुन मी श्री. डहारे सर थाबुंन असलेल्या निलज (खुर्द) येथील पटाचे दानीवर परत गेलो. माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डींग पंच श्री. गडमडे यांचे आवाजात बंद करण्यात आली. मी तसेच पंचानी श्री. डहारे सर यांना घडलेली हकीकत सांगितली. श्री. डहारे सर यांनी व्हॉईस रेकॉर्डीग रिव्हर्स फारवर्ड करुन ऐकले. मी, श्री. डहारे सर यांना गैरअर्जदार श्री. लांजेवार हे त्यांचे कार्यालयात हजर येताच आपणास फोनवर माहिती देतो त्याप्रमाणे आपण निलज खुर्द येथील पटाचे दानीवर यावे व पुढील कार्यवाही करावी अशी विनंती केली.

दिनांक १६/०५/२०२३ रोजी मी श्री. डहारे सर यांना फोनवर संपर्क साधुन गैरअर्जदार आज रोजी ग्रामपंचायत येथे हजर येणार नाही. उद्या दिनांक १७/०५/२०२३ रोजी मोहगावं येथे ग्रामसभा आहे त्यानंतर ते नवेगाव (बुज) येथे हजर येतील असे सांगितले. दिनांक १७/०५/२०२३ रोजी निलज (खुर्द) पटाचे दानीवर मला श्री. डहारे सर, दोन्ही पंच आणि त्यांचे पथकासह हजर भेटले. मी त्यांना आपण पुढील कार्यवाही सेलोटपार रोड शेतशिवारातुन करावी, अशी विनंती केली. त्यावरुन सेलोटपार रोड शेतशिवारात गेल्यावर श्री. डहारे सर यांनी मला तसेच पंचांना कार्यवाही संबंधाने सुचना देवुन पंच श्री.गडमडे यांचे आवाजात व्हॉईस रेकॉर्डर सुरु केला. मी पंच श्री.गडमडे यांचे सोबत ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव (बुज) येथे गैरअर्जदार यांना भेटण्यास गेलो असता मला दोन्ही गैरअर्जदार हे मला ग्रामपंचायत येथे भेटले. त्यांचे सोबत मी माझे कामाबद्दल बोललो असता गैरअर्जदार श्री. लांजेवार, ग्रामसेवक यांनी मला ''माझा सर्व व्यवहार आपले चकोलेच सांभाळते'' असे सांगुन ''मी लालचंदला सायंकाळी ०७:०० वाजता तुझ्या घरी पाठवतो'' असे बोलले. त्यानंतर मी लालचंदला बोललो की ''साहेबांनी त्यांचे सर्व व्यवहार चकोले सांभाळते असे सांगितले आहे'' तेव्हा लालचंद चकोलेनी ''त्यादिवशी

22/05/23

दा. २२/५/२०२३

Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | दराचे 14 चलनी नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

अपराध क्रमांक – 53/2023 कलम 7, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988
फिर्यादीः - सुधीर उत्तम रोडगे, वय 44 म, व्यवसाय- मजुरी, रा. नवेगाव (बुज), ता. मोहाडी, जि. भंडारा.
मोबाईल क्रमांक 7666446528
आरोपीः-1) श्री.धनंजय रामचंद्र लांजेवार, वय 35 वर्ष पदः- ग्रामसेवक, नवेगाव (बुज), रा. लक्ष हास्पीटलचे पाठीमागे शंकरनगर तकिया वार्ड भंडारा,
2) श्री. लालचंद गोपिचंद चकोले,वय 49 वर्ष, पदः- शिपाई, ग्रामपंचायत नवेगाव (बुज), रा. नवेगाव (बुज), तालुका मोहाडी, जिल्हा- भंडारा.
घटनास्थळः- ग्रामपंचायत कार्यालय, नवेगाव (बुज), तालुका मोहाडी, जिल्हा- भंडारा.
घटना ता. वेळ:-दिनांक 22/05/2023 चे 15.40 वा.दरम्यान
मागणी केलेली लाच रक्कम लाचः-7,000/-रुपये.
स्विकारलेली लाच रक्कमः-7,000/-रुपये ज्यात 500 /- रुपये दराचे 14 चलनी नोटा
जप्त मुद्देमालः- 1) 7,000/-रुपये ज्यात 500/-रुपये दराचे 14 चलनी नोटा
1) 2 LM 825637, 2) 3HK 682086, 3) 6PF 903846, 4) 0QD 849451, 5) 0GW 217629, 6) 8QP 350144 , 7) 2LM 122862 , 8) 4NF 867185, 9) 5DE 701504, 10) 9 SN 153619, 11) 0RQ 008096, 12) 0VF 581590, 13) 0KN 866939 , 14) 2LM 995132,
2) 1)श्री. सुधीर उत्तम रोडगे यांचा 100/-रू.चे स्टॅम्प पेपरवर मृतकाचे वारसानबाबतचा प्रतिज्ञालेख -01 प्रत, 2) ग्रामपंचायत नवेगाव(बुज) यांचे परीशिष्ट ब, सभेचे इतिवत्रत्त नोंदवहीचा नमुना -02 प्रत,3) श्री. सुधीर उत्तम रोडगे यांचे 100/-रू.चे स्टॅम्प पेपरवर स्वयंघोषणापत्र प्रपत्र अ -01 प्रत, 4) श्री. सुधीर उत्तम रोडगे यांचे 100/-रू.चे स्टॅम्प पेपरवर स्वयंघोषणापत्र प्रपत्र अ झेराक्स प्रत -01 प्रत, 5)100/-रू.चे स्टॅम्प पेपरवर सहमती पत्र प्रपत्र अ -01 प्रत, 6) पोलीस पाटील यांचा दाखला दिनांक 27/04/2023 चा -01 प्रत,7) तंटामुक्ती समिती नवेगाव (बुज) पं.स. समिती मोहाडी जिल्हा भंडारा यांचा दिनांक 27/04/2023 चा वारसान दाखला -01 प्रत, असे एकुण पाने 8
3)एक 32 32 GB SANDISK MICRO SD असे छापील नाव असलेले मेमोरी कार्ड ज्यावर 2174 TX 3070 DM क्रमांक असलेली.
4) एक काळया राखडी रंगाचा ज्याचेवर चेक्स असलेला ज्याचे डावे बाजुचे खिशाचे आत अॅन्थ्रासिन पावडरचे अंश असलेला फुलपॅन्ट.
प्रकरण अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांचे वडीलाचे नावे घरकुल मंजुर झाले होते. फिर्यादी यांचे वडील मरण पावल्याने सदर घरकुल फिर्यादीच्या आईचे नावाने ग्रामपंचायतचे ठराव वरुन ट्रान्सफर झाले. त्यांनतर फिर्यादीची आई सुध्दा मरण पावल्याने सदरचे घरकुल फिर्यादिचे नावाने ट्रान्सफर करण्यासाठी ग्रामपंचायतचा ठराव पाहीजे असल्याने ठरावा करीता लागणारे सर्व कागदपत्रे तयार करुन फिर्यादी यांनी आलोसे क्रमांक 1.यांचे कडे जमा केले. ग्रामपंचायत घेतलेल्या ठरावाची प्रत घेण्याकरीता फिर्यादी ग्रामपंचायत कार्यालय येथे गेले असता ठरावाची प्रत देण्याकरीता आलोसे क्र1 व आलोसे क्र2 यांनी स्वतःचे आर्थीक फायदया करीता फिर्यादी यांचे कडे 7,000/-रुपयाची मागणी केली. पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे क्र 1 यांनी आलोसे क्र 2 यांचे मार्फतीने 7,000/-



Scanned with CamScanner

सांगितलो होतोन बे मी'' अशा प्रकारे बोलला असल्याने मी श्री. डहारे सर थांबुन असलेल्या ठिकाणी पंच याचे सोबत परत गेलो. माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर पंच श्री.गडमडे यांचे आवाजात बंद करण्यात आले. मी तसेच पंच श्री.गडमडे यांनी श्री.डहारे सर यांना घडलेली हकिकत सांगितली. श्री.डहारे सर यांनी व्हॉईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले माझे तसेच गैरअर्जदार यांचे संभाषण रिव्हर्स फारवर्ड करुन ऐकले. मी श्री. डहारे सर यांना मला वैयक्तीक कामाने बाहेर जाणे असल्याने आपण पुढील कार्यवाही दिनांक १८/०५/२०२३ रोजी करावी अशी विनंती केली. त्यावरुन श्री. डहारे सर यांनी मला सुचना देवुन पुढील कार्यवही सेलोटपार रोड शेतशिवार येथुन करण्यात येईल अशा सुचना दिल्या.

दिनांक १८/०५/२०२३ रोजी मी सेलोटपार रोड शेतशिवार येथे अंदाजे ११:४० वाजता पोहचलो. श्री. डहारे सर, कार्यवाहीतील स्टाफ व दोन्ही पंच यांना भेटलो व गैरअर्जदार श्री.लालचंद चकोले, शिपाई, ग्रामपंचायत नवेगाव (बुज) हे ग्रामपंचायत मध्ये हजर आहे, असे सांगितले असता श्री. डहारे सर यांनी त्यांचे कार्यवाही करीता असलेल्या साहित्यामधुन व्हॉईस रेकॉर्डर, सेल आणि यापुर्वी वापरण्यात आलेले मेमोरी कार्ड दाखवून ते व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन त्यात मेमोरी कार्ड घालुन दाखविले पंच श्री.गडमडे यांचे आवाजात व्हॉईस रेकॉर्डर रेकार्डींग मोडवर सुरु केला मी पंच श्री.गडमडे यांचे सोबत ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव (बुज) येथे गेलो. मला गैरअर्जदार श्री.लालचंद चकोले, ग्रामपंचायत कार्यालयात भेटला. गैरअर्जदार श्री. लालचंद चकोले यांनी श्री. लांजेवार, ग्रामसेवक हे मिटींग मध्ये असतील असे सांगुन लांजेवार साहेबाला काही कमी करायला सांगा असे सांगितले असता गैरअर्जदार श्री.लालचंद चेकोले यांनी **''तु माझे जवळ चार हजार नाही.. त... पाच हजार देशील.. पण त्यांना वाटेल की यान आपल्याजवळ ठेवलन असल''** असे म्हटले व **''साहेबान सांगितलन तेच तुला सांगितले मी, कशाला खोट बोलु''** असे बोलला असल्याने मी पंच श्री.गडमडे यांचे सोबत श्री. डहारे सर थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. माझ्या गळयातील व्हॉईस रेकॉर्डर काढुन रेकार्डींग पंच श्री.गडमडे यांचे आवाजात बंद केली. श्री. डहारे सर यांनी त्यात माझे गैरअर्जदार यांचे सोबत झालेले संभाषण रिव्हर्स फारवर्ड करुन ऐकले. मी, श्री.डहारे सर यांना विनंती केली की, गैरअर्जदार श्री.लांजेवार हे आज कार्यालयात हजर नसल्याने पैसे आज देवू नाही. गैरअर्जदार श्री. लांजेवार हे त्यांचे ग्रामपंचायत कार्यालयात हजर असतांना आपण त्यांना पैसे देवू. ते हजर आल्यानंतर आपणास मी फोनव्दारे कळवतो. त्यानंतर पुढील कार्यवाही करावी अशी विनंती केली. दिनांक १९/०५/२०२३ रोजी गैरअर्जदार श्री.लांजेवार, ग्रामसेवक हे त्यांचे कार्यालयात हजर आले असल्याने मी श्री. डहारे सर यांना फोन करुन माहिती दिली, परंतु गैरअर्जदार श्री. लांजेवार हे लगेच त्यांचे कार्यालयातुन निघून गेल्याने मी श्री. डहारे सर यांना गैरअर्जदार हे कार्यालयातुन निघुन गेले आहेत व दिनांक २०/०५/२०२३ आणि २१/०५/२०२३ रोजी शनिवार व रविवार ग्रामंपचायत कार्यालयाला सुट्टी असल्याने आपण पुढील कार्यवाही दिनांक २२/०५/२०२३ रोजी करावी अशी विनंती केली.

आज दिनांक २२/०५/२०२३ रोजी सकाळी श्री. डहारे सर यांनी मला फोन करुन गैरअर्जदार यांचेबद्दल माहिती विचारली असता, मी त्यांना आज नवेगाव (बुज) येथे ग्रामसभा आहे. ग्रामसेवक येणार आहेत असे सांगितले. आपण सेलोटपार रोड शेतशिवार हजर यावे, मी आपणास तिथे भेटतो असे सांगितले. मी श्री. डहारे सर, दोन्ही पंच व कार्यवाहीतील स्टाफ यांना अंदाजे दुपारी ०१:३० वाजता भेटलो, व श्री. डहारे सर यांना 'गैरअर्जदार श्री.लालचंद चकोले हे ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव (बुज) येथे हजर आहेत परंतु गैरअर्जदार श्री. लांजेवार, ग्रामसेवक हे हजर नाहीत ते मोहगावं येथे गेले आहेत ते परत येणार नाहीत. त्यामुळे गैरअर्जदार श्री. लालचंद चकोले हाच त्यांचा सर्व व्यवहार पाहतो व माझे घरकुलाचे काम करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रत देण्याकरीता गैरअर्जदार श्री. लांजेवार यांनी स्वत:चे आर्थीक फायदया करीता गैरअर्जदार श्री. लालचंद चकोले यांचे

सुधीर रोडगे
ता २२/५/२०२३

22/05/23

Scanned with CamScanner

रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे क्र 2 यांनी पंचा समक्ष 7,000/- रुपये लाचरक्कम स्विकारली असल्याने फिर्यादी यांचे तक्रारीवरुन सदरचा गुन्हा नोंद करून तपास घेतला.
दाखल अधिकारी – पो.हवा/424 अर्पीत भोयर पोलीस स्टेशन करडी मो.क्र. 9881714253
तपासी अधिकारी - पो.नी अमीत डहारे लाच लुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा मो.क्र. 9823240129
सापळा अधिकारी/ भेट देणारे – पो.नी अमीत डहारे लाच लुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा मो.क्र. 9823240129
वेळ 12.10 वा. ते 21.30 वा. पर्यंत

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Arpit Govindrao Bhoyar
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Rajendra Devidas Ga
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):



Scanned with CamScanner

मार्फतीने मागणी केलेली ७,०००/- रुपये लाच रक्कम गैरअर्जदार श्री. लालचंद चकोले, यांनी स्वत: कडे घेण्याची तयारी दर्शविल्याने ती लाच रक्कम गैरअर्जदार लालचंद चकोले यांनी मला मागणी केल्यास त्यांचेकडे देतो' अशी विनंती केल्याने मला तसेच पंच श्री. गडमडे यांना श्री. डहारे सर यांनी सापळा कार्यवाही संबंधाने सुचना दिल्या. माझी अंगझडती पंच क्रमांक २ यांचे कडुन घेतली व माझे फुलपॅन्टचे मागील उजवे खिशात मी त्यांचेकडे सादर केलेले व ज्यावर अॅन्थ्रासिन पावडर लावलेले ५००/-रुपये दराच्या १४ चलनी नोटा पंच श्री. पानबुडे यांचे हस्ते ठेवले. मला तसेच पंच श्री. गडमडे यांना सुचना देवुन गैरअर्जदार यांनी लाचरक्कम स्विकारल्यानंतर आपण डावे हाताने चेहरा पुसण्याचा ईशारा करण्याबाबत सुचना दिल्या. व्हॉईस रेकॉर्डर मध्ये सेल आणि मेमोरी कार्ड घालुन सुरु केले ते मला व पंचाना दाखवून ते पंच श्री. गडमडे यांचे आवाजात सुरु केले. मी पंच श्री गडमडे यांचे सोबत ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव (बुज) येथे गेलो तिथे गैरअर्जदार श्री. लालचंद चकोले मला भेटले. त्यांचेसोबत मी माझे कामा संबंधाने बोलणी केली. तेव्हा गैरअर्जदार श्री. लांजेवार हे निघुन गेले आहेत, असे गैरअर्जदार श्री. लालचंद चकोले यांनी सांगून मला पैसे टेबलावर ठेवण्यास सांगितले. मी पैसे टेबलावर ठेवले असता त्यांनी ते पैसे उचलुन त्यांचे फुलपॅन्टचे डावे खिशात ठेवले. त्यामुळे मी ग्रामपंचायत कार्यालयाचे बाहेरील आवारात येवून श्री. डहारे सर यांना माझा चेहरा डावे हाताने पुसुन गैरअर्जदार यांनी पैसे स्विकारल्याचा नियोजीत ईशारा केला. त्यावरुन श्री. डहारे सर हे त्यांचे स्टाफ व पंच श्री. पानबुडे यांचे सह ग्रामपंचायत येथे येवुन पंच श्री. गडमडे यांना लाच रक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारुन गैरअर्जदार श्री. लालचंद चकोले यास त्यांचे नावगाव विचारुन माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर काढुन पंच श्री. गडमडे यांचे आवाजात रेकॉर्डीग बंद केली. गैरअर्जदार श्री. लालचंद चकोले यास ताब्यात घेवुन त्यांचे पासुन त्यांनी माझे जवळुन स्विकारलेली लाच रक्कम ताब्यात घेतली. गैरअर्जदार श्री. लांजेवार, ग्रामसेवक हे ग्रामपंचायत कार्यालय मोहगाव येथे हजर असल्याने श्री. डहारे सर यांनी त्यांचा स्टाफ मोहगाव ग्रामपंचायत कार्यालय येथे पाठवून गैरअर्जदार श्री. लांजेवार यांना सोबत घेवुन ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव येथे हजर आले. श्री. डहारे सर यांनी त्यांना आपली ओळख सांगुन कार्यवाही संबंधाने माहिती देवुन नावगाव विचारले असता त्यांनी धनंजय रामचंद्र लांजेवार, वय ३५ वर्षे पद :- ग्रामसेवक, नवेगाव (बुज), रा. लक्ष हॉस्पीटलचे पाठीमागे शंकरनगर, तकिया वार्ड, भंडारा असे सांगितले असुन वरील सर्व घटना ही पंच श्री.गडमडे यांचे समक्ष झालेली आहे.

गैरअर्जदार १) श्री. धनंजय लांजेवार, ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव (बुज), गैरअर्जदार २) श्री. लालचंद गोपिचंद चकोले, शिपाई ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव (बु) यांनी माझे आईचे नावाने असलेले घरकुल माझी आई मरण पावल्याने माझे नावाने ट्रान्सफर करण्याकरीता ग्रामपंचायत ठरावाची प्रत देण्याकरीता दोन्ही गैरअर्जदार यांनी स्वत:चे आर्थीक फायदया करीता मागणी केली. पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. .धनंजय रामचंद्र लांजेवार, ग्रामसेवक यांनी गैरअर्जदार क्र.२) श्री. लालचंद गोपिचंद चकोले पद:- शिपाई यांचे मार्फतीने लाच रक्कम ७,०००/-रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने आणि सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार श्री. लालचंद चकोले यांनी माझे जवळुन लाच रक्कम ७,०००/-रुपये स्विकारले असल्याने गैरअर्जदार १) श्री.धनंजय रामचंद्र लांजेवार, वय ३५ वर्षे पद :- ग्रामसेवक, नवेगाव (बुज), रा. लक्ष हॉस्पीटलचे पाठीमागे शंकरनगर तकिया वार्ड भंडारा, २) श्री. लालचंद गोपिचंद चकोले, पद:- शिपाई, रा. नवेगाव (बु), तालुका- मोहाडी, जिल्हा- भंडारा. दोन्ही नेमणुक ग्रामपंचायत कार्यालय नवेगाव (बुज) तालुका- मोहाडी, जिल्हा- भंडारा. यांचे विरुध्द कायेदशीर कार्यवाही होणेस तक्रार देत आहे.

माझी तोंडी तक्रार पोलीस स्टेशन, करडी येथे लॅपटॅपवर मी सांगितले प्रमाणे टंकलीखीत केली असुन त्यांची प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली मी सांगितले प्रमाणे बरोबर टाईप केले आहे.

22/05/23



Scanned with CamScanner